मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# जलसंकट टळले 'पवना' निम्मे भरले

## पाणीपुरवठ्याच्या वेळापत्रकात मात्र 'जैसे थे' : पिंपरी-चिंचवडकरांच्या नशिबी प्रतीक्षाच !

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड: मागील चार दिवसांपासून धरण पाणलोट क्षेत्रात सुरू असलेल्या जोरदार पावसामुळे पिंपरी-चिंचवडकरांची तहान भागवणारे पवना धरण ४९.३० टक्के म्हणजे निम्मे भरले आहे. पुढील सहा महिने पुरेल एवढा हा पाणीसाठा आहे. मात्र, महापालिकेने पाणीपुरवठा दिवसाआडच सुरू राहणार असल्याचे स्पष्ट केले. त्यामुळे शहरवासीयांना दररोज पाणीपुरवठ्याची आणखी प्रतीक्षा करावी लागणार आहे.

पिंपरी-चिंचवडसह मावळ भागातील विविध गावांचा पाण्याचा पवना धरण मुख्य स्रोत आहे. पावसाने ओढ दिल्याने धरणातील पाणीसाठा १७ टक्क्यांवर आला होता. मावळातील आंद्रा, वडिवळे, टाटा या छोट्या धरणांमधील पाणीसाठ्याने तळ गाठायला सुरुवात केली होती.




### जिल्ह्यातील धरणांमध्ये 57.87 टीएमसी

» पुणे जिल्ह्यात टाटा समूहाच्या सहा धरणांव्यतिरिक्त इतर २६ धरणांमध्ये एकूण उपलब्ध जलसाठा ५७.८७ टीएमसी झाला आहे. मागच्या वर्षाच्या तुलनेत या वर्षी जलसाठा ३.३४ टीएमसीने कमी आहे. मागच्या वर्षी याच दिवशी जलसाठा ६१.२१ टीएमसी होता. पुणे जिल्ह्यात एकूण ३२ धरणं आहेत. त्यापैकी सहा धरणं टाटा समूहाची आहेत. टाटा समूहाच्या धरणांव्यतिरिक्त २६ धरण आहेत. जिल्ह्यातील धरणांमध्ये उजनी, भामा आसखेड, मानिकडोह, चासकमान, पावना, मुळशी, टेमघर, वरसगाव, पानशेत, गुंजवणी, नीरा देवघर, भाटघर, वीर इत्यादी धरणं समाविष्ट आहेत.

### पुण्याच्या पाण्याचाही प्रश्न मिटला

» पुणे शहराला पाणीपुरवठा करणारी खडकवासला प्रकल्पातील चारही धरणे मागच्या आठवड्यापासून होणाऱ्या पावसामुळे निम्म्याहून जास्त भरली आहेत. त्यामुळे आता पुणे शहरातील पाण्याच्या कमतरतेचे संकट कायमचे दूर झाले आहे. सध्या खडकवासला प्रकल्पातील जलसाठा पुणेकरांना किमान पुढील आठ महिन्यांपर्यंत पाणीपुरवठा करण्यास सक्षम आहे.

### अधिक जलसाठा उपलब्ध

» आता पाऊस सुरू झाल्यामुळे हा जलसाठा दिवसेंदिवस वाढत आहे. शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या खडकवासला प्रकल्पातील चार धरणांमध्ये मागच्या वर्षी २२ जुलैला १४.१२ टीएमसी (४८.४१ टक्के) संयुक्त जलसाठा होता. त्यामुळे मागच्या वर्षाच्या तुलनेत या वर्षी या धरणांमध्ये ०.५१ टीएमसी (१.७७ टक्के) अधिक जलसाठा उपलब्ध आहे.

मागील चार दिवसांपासून पावसाने धरण पाणलोट क्षेत्रात दमदार हजेरी लावली. जोरदार पावसाने धरणातील पाणीसाठ्यात झपाट्याने वाढ झाली.

# विधानसभा निवडणूकीआधी रखडलेल्या महापालिकांच्या निवडणुका घ्या

## निवडणूक आयोग आणि सत्ताधाऱ्यांनी निवडणुकीसाठी तत्परता दाखवावी, शिवसेना (ठाकरे गट) चिंचवड विधानसभा संघटक संतोष सौंदणकर यांची मागणी...

**पिंपरी | प्रतिनिधी**

राज्यात गेल्या अनेक वर्षांपासून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या रखडलेल्या निवडणुकांची दखल सत्ताधारी राजकीय नेतृत्वांना घ्यावी वाटत नाही, हे समाजासाठी घातक आहे. हुकूमशाहीला पोषक असे वातावरण यातून निर्माण होत आहे. प्रशासकीय राजवटीत सर्वसामान्यांचे प्रश्न सुटत नाहीत. निवडणूक आयोग देखील महापालिकेसह इतर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घ्यायचे धाडस करत नाही. दुसरीकडे लोकसभेच्या निवडणुका वेळेत होतात; राज्याच्या विधानसभा निवडणूका घ्यायचीही तत्परता दिसते. तशी वातावरण निर्मितीही केली जाते. मग राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या बाबतीत घोडं कुठ अडलय? स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका टाळण्याचं पाप कुणाचं? हे जनतेने ओळखून त्यांना धडा शिकविण्याची गरज आहे. निवडणूक आयोगाने काही काळासाठी विधानसभा निवडणूक पुढे ढकलावी आणि महापालिकांसह इतर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घ्याव्यात, अशी मागणी शिवसेना उद्धव ठाकरे गटाचे चिंचवड विधानसभा शहर संघटक संतोष सौंदणकर यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे केली आहे.

प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात त्यांनी म्हटले आहे की, सध्या राज्यातील मुंबई, पुणे, कोल्हापूर, नाशिक, पिंपरी चिंचवड महापालिकांसह राज्यातील २९ महानगरपालिका, ३८५ पैकी २५७ नगरपालिका, नगरपंचायती, ३४ पैकी २६ जिल्हा परिषदा आणि ३५१ पैकी २८९ पंचायत समित्यांवर प्रशासकराज आहे. उर्वरित ठिकाणच्या निवडणुका वर्ष-दीड वर्षावर आल्या आहेत. प्रशासकीय कारभारावर कोणाचाही वचक नाही. तसेच त्यांच्याविरोधात कुठे दादही मागता येत नाही. स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये लोकप्रतिनिधी नसल्यामुळे सामान्य नागरिकांचे मरण होत आहे. त्याचा सर्वाधिक फटका हा वंचितांना बसतो. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका कधी होणार? असा सवाल सर्वसामान्य नागरिकांना पडला आहे. प्रलंबित महापालिकेसह इतर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घ्यायचे धाडस निवडणूक आयोगाने दाखवावे.चा प्लॅन त्यांचा ठरला. त्यानुसार, इंद्रायणी नदीत आरोपींनी समरीनचा मृतदेह फेकला. आईला फेकल्याचे पाहून दोन्ही मुले मोठमोठ्याने रडू लागली. त्यामुळे नराधम आरोपींनी दोन्ही मुलांना देखील जिवंतपणे नदीत फेकून दिले. या प्रकरणी गुन्हा दाखल करून पोलिसांनी आरोपींना अटक केली आहे.




### तत्परता दाखविणे आवश्यक

» कार्यकर्ताच स्थानिक पातळीवर सक्षम नसेल तर, खाली पक्ष वाढीसाठी काम कोण करणार? लोकांचे स्थानिक प्रश्न सोडविण्यासाठी सत्ताधाऱ्यांनी यात हस्तक्षेप करण्याची वेळ आली आहे. त्यासाठी तत्परता दाखविणे आवश्यक आहे. त्यासाठी आगामी विधानसभा निवडणुका काही काळ पुढे ढकलाव्यात. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी प्रयत्न करावेत, असे या पत्रकात सौंदणकर यांनी म्हटले आहे.

" महाराष्ट्रात महाविकास आघाडीची सत्ता होती. त्यावेळी त्यांनी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचा कार्यक्रम जाहीर केला होता. प्रभाग रचना, आरक्षण आणि निवडणुकीची तारीखही जाहीर झाली होती. त्यानंतर भाजपचे सरकार राज्यात आले. सद्यस्थितीत भारतीय जनता पार्टीची गल्लीपासून दिल्लीपर्यंत सत्ता आहे. लोकसभा आणि विधानसभेच्या निवडणुका ते वेळेत घेतात. परंतु, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका जाणूनबुजून प्रलंबित ठेवल्या जात आहेत. भाजपकडून प्रशासकीय राजवटीचा फायदा केवळ स्वार्थासाठी होत आहे? की नगरसेवकांवर होणारा प्रशासकीय खर्च वाचविण्यासाठीचा हा नुसता खाटाटोप आहे? हे एकदाचे तरी जाहीर करावे."
- **संतोष सौंदणकर,** शिवसेना (उद्धव ठाकरे) शहर संघटक – चिंचवड विधानसभा...

# रविकांत तुपकर यांची मोठी घोषणा!

## पुण्यात आपल्या समर्थकांसोबत रविकांत तुपकर यांनी महत्त्वाची बैठक घेतली. या बैठकीनंतर त्यांनी मोठी घोषणा केली

**पुणे | प्रतिनिधी**

राज्यातील शेतकरी नेते रविकांत तुपकर यांची स्वाभिमानी शेतकरी संघटनेतून हकालपट्टी करण्यात आली होती. स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते आणि माजी खासदार राजू शेट्टी यांच्याविरोधात भूमिका घेऊन संघटनेची हानी केल्याचा आरोप रविकांत तुपकर यांच्यावर करण्यात आला होता. स्वाभिमानी शेतकरी संघटना प्रदेशाध्यक्ष जालिंदर जाधव यांनी ही कारवाई केली होती.

स्वाभिमानी शेतकरी संघटनेत सध्या वादळ आलं आहे. स्वाभिमानी शेतकरी संघटनेत अनेक वर्ष काम करणारे नेते रविकांत तुपकर यांच्यावर पक्षाने निलंबनाची कारवाई केली आहे. पक्षांतर्गत मतभेदांमुळे ही कारवाई करण्यात आली आहे. स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे प्रदेशाध्यक्ष जालिंदर पाटील यांनी दोन दिवसांपूर्वी पत्रकार परिषद घेत आपली भूमिका मांडली. आजपासून आमचा आणि रविकांत तुपकर यांचा काहीच संबंध नसल्याचं जालिंदर पाटील म्हणाले होते. त्यामुळे कोल्हापूरच्या राजकारणात एकच खळबळ उडाली होती. रविकांत तुपकर यांनी ट्वीट करत आपल्यावर झालेल्या कारवाईवर प्रतिक्रिया दिली होती. आपल्यावर करण्यात आलेली निलंबनाची कारवाई ही धक्कादायक आहे, असं रविकांत तुपकर म्हणाले होते. यानंतर आज महत्त्वाच्या घडामोडी घडल्या. रविकांत तुपकर यांनी पुण्यात आपल्या समर्थकांसोबत बैठक घेतली. या बैठकीनंतर त्यांनी आपल्या नव्या पक्षाची आणि आगामी धोरणांबाबत मोठी घोषणा केली.

आमदार रविकांत तुपकर यांनी आता मोठी घोषणा केली आहे. रविकांत तुपकर यांची स्वाभिमानी शेतकरी संघटनेत निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे. यानंतर रविकांत तुपकर यांनी नव्या संघटनेची घोषणा केली आहे. रविकांत तुपकर यांनी पुण्यात कार्यकर्त्यांसोबत बैठक घेतली. या बैठकीत आगामी विधानसभा निवडणुकीत 25 जागांवर निवडणूक लढवण्याचं ठरलं. या बैठकीनंतर रविकांत तुपकर यांनी आपला पक्ष हा येत्या निवडणुकीत 25 जागांवर निवडणूक लढवणार, अशी घोषणा केली.



### रविकांत तुपकरांनी महाराष्ट्र क्रांतीकारी आघाडीची केली स्थापना

» स्वाभिमानी शेतकरी संघटनेतून हकालपट्टी झाल्यानंतर रविकांत तुपकर यांनी आज पुण्यात पत्रकार परिषद घेऊन महाराष्ट्र क्रांतीकारी आघाडीची घोषणा केली आहे. येत्या विधानसभेमध्ये रविकांत तुपकर महाराष्ट्र क्रांतीकारी आघाडीच्या माध्यमातून 25 जागा लढवणार आहेत. 25 जागांमध्ये बुलडाणा जिल्हयातील 6 जागांचा समावेश आहे. तसेच लवकरच राज्यव्यापी आंदोलन करणार असल्याचे रविकांत तुपकर यांनी यावेळी जाहीर केले.

### कोण आहेत रविकांत तुपकर ?

» रविकांत तुपकर हे महाराष्ट्रातील राजकारणी व चळवळीचे अग्रणी नेते आहेत. ते मूळचे बुलढाणा जिल्ह्यातील आहेत. ते स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे राज्याचे नेते आहेत तसेच ते महाराष्ट्र राज्य वस्त्रोद्योग महामंडळाचे अध्यक्ष होते. त्यांना राज्यमंत्री पदाचा दर्जा होता.

### रविकांत तुपकर भावनिक

» राजू शेट्टी यांना माझ्यावर कारवाई करुन सुखाची झोप लागली असेल. त्यांच्या वाटेतला काटा दूर झाला, असं त्यांना आता वाटत असेल. आम्ही २२ वर्ष लाल बिल्ला घराघरात पोहचवण्याचं काम केलं", असं रविकांत तुपकर म्हणाले. यावेळी ते भावनिक झाले. "मला पदासाठी करायचं असतं तर मागेच मला भाजप उमेदवारी देणार होतं. पण मी गेलो नाही. आज बैठक होत आहे. बैठकीत ठरवू काय कारायचं ते", असं रविकांत तुपकर म्हणाले.

# पूजा खेडकर यांच्या आई-वडिलांच्या घटस्फोटासंदर्भात पुणे पोलिसांचा दहा पानांचा अहवाल

## पूजा खेडकर यांच्या आई-वडिलांच्या घटस्फोटासंदर्भात केंद्र सरकारने अहवाल सादर करण्याये आदेश दिले होते

**पुणे | प्रतिनिधी**

पूजा खेडकर यांच्या आई-वडिलांच्या घटस्फोटासंदर्भात केंद्र सरकारने अहवाल सादर करण्याये आदेश दिले होते. त्यानंतर दहा पानांचा हा अहवाल पुणे पोलिसांनी तयार करुन राज्य सरकारकडे गुरुवारी पाठवला आहे. त्यात २०१० मध्ये कुठल्याही अटी शर्थीशिवाय घटस्फोट झाल्याचे म्हटले आहे.

प्रशिक्षणार्थी वादग्रस्त आयएएस अधिकारी पूजा खेडकर यांच्या आई-वडिलांच्या घटस्फोटासंदर्भात केंद्र सरकारने अहवाल सादर करण्याये आदेश दिले होते. त्यानंतर दहा पानांचा हा अहवाल पुणे पोलिसांनी तयार करुन राज्य सरकारकडे गुरुवारी पाठवला आहे. त्यात २०१० मध्ये कुठल्याही अटी शर्थीशिवाय घटस्फोट झाल्याचे म्हटले आहे. पूजा खेडकर यांना ओबीसी कोट्यातून अर्ज करता यावे, त्यांना नॉन क्रिमिलेअरचा लाभ मिळावा, यामुळे हा घटस्फोट दाखवल्याचा आरोप होत होता. १० पानांच्या या अहवालात घटस्फोटाबाबतच्या कायदेशीर बाबीच्या नोंदी आहेत. त्यामुळे या अहवालानंतर घटस्फोटामागील गूढ उलघडणार आहे.. पूजा खेडकर सर्व बाजून अडचणीत आल्या आहेत. पुणे जिल्हाधिकारी सुहास दिवसे यांच्यावर त्यांनी आरोप केले होते. त्याच्या चौकशीसाठी पुणे पोलिसांनी दोन वेळा त्यांना बोलवले. परंतु त्या आल्या नाहीत. त्यानंतर मसूरीमधील लाल बहादूर शास्त्रीय प्रशासकीय अकादमीने त्यांचे प्रशिक्षण थांबवून त्यांना 23 जुलै पूर्वी मसूरी येथील अकॅडमीमध्ये पुन्हा हजर राहण्याचे आदेश दिले होते. परंतु त्या ठिकाणी त्या गेल्या नाहीत. त्यांची आई एका गुन्ह्यात येरवडा कारागृहात आहे. वडिलांची एसीबी चौकशी सुरु आहे.



### त्या अहवालात काय?

» राज्य सरकारने हे प्रकरणी सीआयडीकडे दिले होते. परंतु या प्रकरणाचा तपास पुणे पोलीस करत असल्यामुळे त्यांच्याकडे मनोरमा खेडकर आणि दिलीप खेडकर यांच्या घटस्फोटाचा अहवाल देण्याचे काम दिले. अखेरी तो अहवाल पुणे पोलिसांनी तयार करुन राज्य सरकारकडे सादर केला. त्या दहा पानांच्या अहवालात सर्व माहिती दिली गेली आहे.

### काय आहे प्रकरण

» वादग्रस्त प्रशिक्षणार्थी अधिकारी पूजा खेडकर यांच्या आई-वडीलांचे उत्पन्न कोट्यवधींमध्ये आहेत. त्यांचे वडील दिलीप खेडकर यांनी नुकतीच अहमदनगर मतदार संघातून निवडणूक लढवली होती. त्यामध्ये त्यांनी त्यांचे आणि कुटुंबाचे उत्पन्न 40.5 कोटी दाखवले होते. ते स्वत: शासकीय सेवेत वर्ग एक अधिकारी होते. त्यानंतर त्यांना नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र कसे मिळाले? पूजा खेडकर यांची आई मनोरम खेडकर या कोट्यवधी रुपये किंमतीच्या घरात राहतात. त्यांच्याकडे जमीन आहे. मग त्याकाळी क्रिमिलेअरसाठी साडेचार लाखांची मर्यादा होती. त्याने ते प्रमाणपत्र कसे मिळले? दिलीप खेडकर आणि पूजा खेडकर खरंच वेगवेगळे राहतात का? त्यांचा घटस्फोट झाला आहे का? या संदर्भात चौकशी करुन अहवाल देण्याचे आदेश केंद्र सरकारने राज्य सरकारला दिले होते.

# पिंपरी-चिंचवड शहरात 'एसआरए'चे पीक जोमात

## 'टीडीआर'साठी बिल्डर लॉबीची झोपडपट्ट्यांवर नजर : संमतीपत्रासाठी होणाऱ्या दादागिरीमुळे स्थानिकांत दहशत

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहरात घोषित आणि अघोषित सुमारे ७२ झोपडपट्ट्या आहेत. या ठिकाणी झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प राबवण्यासाठी स्थानिक बिल्डर लॉबी कार्यरत झाली आहे. शहरातील रस्त्याच्या कडेला असणाऱ्या दहा ते पंधरा झोपडट्ट्यांवर एसआरए प्रकल्प राबवण्यासाठी हालचाली सुरू आहेत. कारण, अडीच पट टीडीआर मिळत असल्याने शहरातील बांधकाम व्यावसायिकांची झोपडपट्टीवर नजर पडू लागली आहे. त्यामुळे स्थानिक नागरिकांवर साम, दाम, दंड वापरून समंतीपत्र मिळवण्यासाठी दादागिरी सुरू झाली आहे. त्यामुळे झोपडपट्टी नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरू लागले आहे.




पिंपरी-चिंचवड शहरात एसआरए (झोपडपट्टी पुनर्वसन) प्रकल्प मोठ्या प्रमाणावर सुरू झाले आहेत. शहरातील झोपडपट्टी भागात खासगी विकासकांना एसआरए प्रकल्पांतर्गत घरकुल इमारत बांधकाम परवानगी देण्यात येत आहे. एसआरएस प्रकल्पाअंतर्गत झोपडपट्टीधारकांवर दहशत माजवून घर खाली करण्यासाठी नागरिकांवर दबाव आणला जात आहे. एसआरए सर्व्हेच्या नावाखाली शहरातील अनेक झोपडपट्टी भागात बिल्डर आणि गुंड प्रवृत्तीच्या लोकांकडून दहशत पसरवली जात आहे. निगडीतील सेक्टर क्रमांक २२ या ठिकाणी ५० पत्र्यांचे शेड उभारले आहे. या भागात बोगस सर्व्हे करण्यास एसआरए प्रकल्प अधिकारी या बिल्डर व गुंडांना पाठबळ देत असल्यामुळे बिल्डर व गुंडांची दहशत वाढली आहे. झोपडपट्टी पुनर्वसनाच्या नावाखाली बिल्डर, काही गुंड प्रवृत्तीच्या लोकांनी अनेक भागात दहशत निर्माण करून सह्यांची मोहीम राबवण्यात येत आहे. यामुळे झोपडपट्टीतील स्थानिक नागरिक व बिल्डर संघर्ष सुरू झाला आहे. याबाबत निगडीच्या सेक्टर २२ या भागातील रहिवासी हे रस्त्यावर ठिय्या आंदोलनाच्या तयारीत आहेत.

एसआरएच्या नावाखाली बिल्डर आणि गुंड प्रवृत्तीच्या लोकांनी त्या भागातील आझाद चौक झोपडपट्टी, श्रमिकनगर, संग्रामनगर, दळवीनगर, भागात एसआरए मार्फत सर्वेक्षण करण्यात येत आहे. त्यामुळे बिल्डर व गुंड प्रवृत्तीच्या लोकांनी बळजबरीने घर खाली करून घेण्यासाठी दबावतंत्राचा वापर केल्याचा आरोप नागरिक करत आहेत. दरम्यान, एसआरए प्रकल्पांतर्गत शहरातील झोपडपट्टी भागात खासगी विकासकांना बांधकाम परवानगी देण्यात आली. त्या सर्वांची योग्य ती चौकशी करावी, नागरिकांवर दादागिरी करून विविध आमिषे दाखवून स्वाक्षरी घेण्याची मोहीम राबवली जात आहे. ती तातडीने थांबवण्यात यावी. संबंधित विकासकाच्या विरोधात कडक कारवाई करण्यात यावी, अशी प्रमुख मागणी नागरिकांकडून केली जात आहे.

**एसआरए सीईओ आणि बिल्डरांचे लागेबांधे?**

» एसआरए प्रकल्प अधिकारी आणि खासगी विकासक यांचे आर्थिक हितसंबंध आहेत. बिल्डर व इतर राजकीय नेत्यांनी झोपडपट्टी पुनर्वसन नावाखाली एसआरए प्रकल्प राबविण्यासाठी दहशत पसरविली जात आहे. शहरातील बहुतांश झोपडपट्टी पुनर्वसन नावाखाली बिल्डरांनी झोपडपट्टी पुनर्वसन सुरू केले आहे. यापैकी काही ठिकाणी झोपडपट्टीतील नागरिकांना मोर्चा, आंदोलन वगैरे करून एसआरए प्रकल्पाबाबत आक्षेप घेतले आहेत. काही ठिकाणी सामान्य झोपडपट्टीधारकांनी आंदोलन करण्याचा इशारा एसआरए प्रकल्प विभागाकडे दिला आहे. मात्र, त्या संदर्भात एसआरए प्रकल्प अधिकारी यांनी दखल घेतलेली नाही. उलट बिल्डरला फोन करून झोपडपट्टीधारक आंदोलन, मोर्चा काढणार आहेत, अशी माहिती देत आहेत. त्यामुळे एसआरए अधिकाऱ्यांचे मोबाईल कॉल रेकॉर्ड पोलिसांकडून काढून घेण्यात यावे. जेणेकरून बिल्डर व एसआरए प्रकल्प अधिकारी यांचे आर्थिक हितसंबंध जगजाहीर होण्यास मदत होतील.

“ झोपडपट्टी भागात बिल्डर, झोपडपट्टीधारक यांचे वादविवाद होत आहेत. बिल्डर गुंड प्रवृत्तीच्या लोकांना बरोबर घेऊन झोपडपट्टीधारकांवर दादागिरी करत सह्यांची मोहीम घेत आहेत. अनेकांना आर्थिक लाभाचे आमिष दाखवून बिल्डर झोपडपट्टीधारकांना प्रलोभन देऊन झोपडपट्टी खाली करण्यासाठी दबाव तंत्राचा वापर करून दडपशाही सुरू आहे. त्या संदर्भात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे लेखी पत्राद्वारे तसेच ईमेलवर तक्रार दाखल केली आहे. याबाबत एसआरए प्रकल्प अधिकारी नीलेश गटणे यांची चौकशी व्हावी. तसेच त्यांच्या मालमत्तेची चौकशी करण्यात यावी.

- सचिन काळभोर , सामाजिक कार्यकर्ते, निगडी.

# भाजपकडून प्रभाग स्तरीय मोफत आरोग्य शिबीरे व रुग्णांना फळ वाटप

## उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा वाढदिवस साजरा : दहा हजारहून अधिक रुग्णांनी घेतला आरोग्य शिबीराचा लाभ

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहर भाजपच्या वतीने राज्याचे उपमुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त संपूर्ण चिंचवड विधानसभा मतदारसंघात प्रभाग स्तरीय मोफत आरोग्य शिबीरांचे आयोजन करण्यात आले होते. चिंचवड मतदारसंघातील विविध १३ ठिकाणी आयोजित या शिबीरांमध्ये १० हजाराहुन अधिक गोरगरीब रुग्णांची मोफत आरोग्य तपासणी आणि औषधोपचार करण्यात आले. तसेच महापालिकेच्या यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयात (वायसीएम) सर्व रुग्णांना फळ व बिस्कीटांचे वाटप करून उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा वाढदिवस साजरा करण्यात आला.



यावेळी भाजपा शहराध्यक्ष शंकर जगताप, प्रदेश सदस्य सदाशिव खाडे, शहर सरचिटणीस विलास मडिगेरी नामदेव ढाके, मोरेश्वर शेडगे, अभिषेक बारणे, उपाध्यक्ष राजू दुर्गे, रुग्णालयाचे अधिष्ठता राजेश वाबळे, वैद्यकीय अधीक्षक अभयचंद्र दादेवार, महेंद्र बाविस्कर, देवदत्त लांडे, सतिश नागरगोजे आदी पक्षाचे पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

प्रभाग क्र.१६ एमबी कॅम्प विकासनगर, प्रभाग क्र.१७ तुळजाभवानी मंदिर बिजलीनगर, प्रभाग १८ कै. शिवाजी भोईर सांस्कृतिक भवन, चिंचवडगाव, प्रभाग २२ पार्वती इंग्लिश मिडीअम स्कूल, ज्योतिबा नगर, काळेवाडी, प्रभाग २३ पडवळ नगर थेरगाव, प्रभाग २४ लक्ष्मीबाई बारणे विद्यालय गुजरनगर थेरगाव, प्रभाग क्र. २५ दत्त मंदिर माउली चौक वाकड, समीर भुजबळ चौक पुनावळे, अधिरा इंटरनॅशनल स्कूल पुनावळे, कस्तुरी चौक वाकड, प्रभाग २६ जेष्ठ नागरिक विरंगुळा केंद्र पिंपळे निलख, मनपा शाळा कस्पटे वस्ती वाकड, जेष्ठ नागरिक विरंगुळा केंद्र वेणू नगर, वाकड, प्रभाग २७ बळीराज कॉलनी नखाते वस्ती चौक रहाटणी, प्रभाग २८ पी.के.शाळेसमोर पिंपळे सौदागर, प्रभाग २९ महालक्ष्मी मंगल कार्यालय सुदर्शन नगर, सृष्टी चौक पिंपळे गुरव, प्रभाग ३१ शंकर पांडूरंग जगताप जनसंपर्क कार्यालय, कृष्णा चौक नवी सांगवी, प्रभाग ३२ शुभयोग मंगल कार्यालय ढोरे नगर, जुनी सांगवी या ठिकाणी आरोग्य शिबीरे घेण्यात आली. यामध्ये मोफत इसीजी तपासणी, मोफत डोळयांची दृष्टी तपासणी, दृष्टी तपासणीत मोतीबिंदू आढळल्यास मोतीबिंदू शस्त्रक्रियेत सूट, हाडांची ठिसुळता चाचणी, सर्व प्रकारच्या चष्म्यांवर ३० टक्के सूट, ब्लड शुगर तपासणी, मणक्यांच्या आजाराची तपासणी आदी मोफत तपासण्या करण्यात आल्या. शहर सरचिटणीस नामदेव ढाके, बाळासाहेब तरस, माजी नगरसेवक सुरेश भोईर, जवाहर ढोरे, हर्षद नढे, प्रमोद पवार, सनी बारणे, विशाल कलाटे, चेतन भुजबळ, नवनाथ ढवळे, भारती विनोदे, नितीन इंगवले, प्रसाद कस्पटे, अभिजित साळंखे, नरेश खुळे, संजय भिसे, अमर आदियाल, संजय मराठे यांनी या मोफत आरोग्य शिबीरांचे आयोजन केले.

“ राज्याच्या विकासासाठी लोकनेते देवेंद्र फडणवीस हे अहोरात्र झटत आहेत. हाती घेतलेले काम झपाट्याने पूर्ण करीत असताना त्यांची नाळ जनतेशी जुळली गेली आहे. राज्यातील रस्ते, वीजपुरवठा, उद्योग, सिंचन या बाबी राज्याचा विकासदर निश्चित करण्यासाठी कामी येत असल्या, तरी गरीब-सर्वसामान्य, तळागाळातील नागरिकांच्या चेहऱ्यावरील आनंद हाच प्रगती मोजण्याचा मापदंड असतो. नागरिकांचे आरोग्य, विकासाची स्पष्ट दृष्टी, निश्चित दिशा आणि कोणताही व्यक्तिगत स्वार्थ न बाळगता काम करण्याची दिशा देवेंद्र फडणवीस यांच्याकडून मिळते. या लोकनेत्याच्या वाढदिवसानिमित्त पिंपरी-चिंचवड भाजपच्या वतीने प्रभाग स्तरीय मोफत आरोग्य शिबीरांचे आयोजन करून गोरगरीब रुग्णांची आरोग्य सेवा करण्यात आली.

- शंकर जगताप, शहराध्यक्ष – भाजपा पिंपरी चिंचवड शहर (जिल्हा)

**आई- वडीलांचे छत्र हरपलेल्या अरमान शेखला उपचारासाठी मदत...**

» दरम्यान, वायसीएम रुग्णालयात उपचार घेत असलेल्या अरमान शिरू शेख, रा. भोसरी या रुग्णाबाबत माजी नगरसेविका भीमाताई फुगे यांनी शहराध्यक्ष शंकर जगताप यांना वायसीएम रुग्णालय भेटीत माहिती दिली. या रुग्णाची लगेच प्रत्यक्ष भेट घेवून जगताप यांनी त्याची विचारपूस केली. आई – वडीलांचे छत्र हरपल्याचे भीमा फुगे व त्याच्या लहान बहिणीकडून समजले. जात धर्म याचा कधीच विचार करत न करता २० हजाराची रोख मदत उपचार व औषध खर्चासाठी शंकर जगताप यांनी शेख बहिण-भावाकडे सुपूर्त केली. तसेच, रुग्णालयातील डॉक्टरांना आवश्यक सर्व उपचार करण्याच्या सूचना शंकर जगताप यांनी डॉक्टर यांना दिल्या. भीमा फुगे या रोज वायसीएम रुग्णालयात भेट देवून अरमान शेख याची विचारपूस करीत असून, भाजपा अंत्योदयचा विचार करून आईची माया देत आहेत.


# महापालिकेच्या नोटीशीला होर्डिंग्जधारकांकडून केराची टोपली!

## कोंढवा खुर्द, कौसरबाग, वडगाव, धायरीतील 37 हजार चौरस फूट बेकायदा बांधकाम हटवले

**पुणे | प्रतिनिधी**

महापालिकेने अधिकृत मान्यता देऊनही नियमबाह्य पद्धतीने उभारण्यात आलेल्या सुमारे १७०० जाहिरात होर्डिंगधारकांनी नोटिसा बजावण्यात आल्या आहेत. नोटिशीनुसार नियमानुसार होर्डिंगमध्ये बदल करून घेणे बंधनकारक आहे. त्यानुसार १०२४ होर्डिंगधारकांनी अपेक्षित दुरुस्ती केल्याचा दावा महापालिकेने केला आहे. तर दुसरीकडे ६७५ होर्डिंगधारकांनी महापालिकेच्या नोटीसवजा आदेशाला केराची टोपली दाखविली असल्याचे समोर आले आहे.





मुंबईतील घाटकोपर येथील होर्डिंग दुर्घटनेत सोळा जणांचा मृत्यू झाल्याची घटना घडली होती. यामुळे राज्यात संतापाची लाट पसरली होती. या घटनेनंतर महापालिका प्रशासनाला खडबडून जाग आली आणि त्यांनी शहरातील बेकायदा होर्डिंगवर कारवाई करण्यास सुरुवात केली होती. परंतु होर्डिंगधारकांनी महापालिका आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले यांची भेट घेतल्यानंतर ही कारवाई थंडावली होती. तसेच आयुक्तांनी सर्वेक्षणाचे आदेश दिले. मात्र त्यावर क्षेत्रीय कार्यालय स्तरावरून कोणतीही कार्यवाही झाली नव्हती. यानंतर महापालिका आयुक्तांनी या होर्डिंग्जचे पुन्हा एकदा सर्वेक्षण करण्याचे आदेश दिले होते. या सर्वेक्षणाच्या अहवालानुसार महापालिकेने परवानगी दिलेल्या २,६३८ होर्डिंग्जपैकी १,६९९ होर्डिंग्जधारकांनी नियमांना फाटा दिल्याचे निदर्शनास आले.

पालिकेने नोटीस बजावल्यानंतर १,०२४ होर्डिंग्जधारकांनी दुरुस्ती करून घेतली आहे. अद्याप ६७४ होर्डिंग्जधारकांनी कार्यवाही केलेली नाही. त्यामुळे आता अशा होर्डिंगधारकांवर महापालिकेकडून कारवाई होणार का, असा प्रश्न उपस्थित केला जाऊ लागला आहे. १५ मे ते १९ जुलैदरम्यान प्रशासनाने १०० अनधिकृत होर्डिंग्ज उतरवल्याची माहिती अतिरिक्त आयुक्त पृथ्वीराज बी.पी. यांनी दिली.

शहरात वादळी वाऱ्यासह जोरदार पावसाने हजेरी लावण्यास सुरुवात केल्याने महापालिकेने होर्डिंग व्यावसायिकांना जाहिरातीचे फ्लेक्स उतरविण्यास सांगितले होते. त्यानुसार काही व्यावसायिकांनी होर्डिंग उतरविले. मात्र, होर्डिंगविरोधातील कारवाई थंड पडली आहे. होर्डिंगधारकांना होर्डिंग नियमानुसार उभारणीचे आदेश दिले होते. त्यानंतर दिलेल्या मुदतीत अनेक होर्डिंगधारकांनी अपेक्षित बदल केले आहेत. परंतु खरंच ते बदल कशाप्रकारे केले आहेत, याची माहिती अद्याप समोर आलेली नाही. मात्र विभागाने दिलेली माहिती मान्य करून ज्या होर्डिंगधारकांनी नियमानुसार होर्डिंगमध्ये बदल करून घेतले नाहीत, त्यांच्यावर तरी कारवाई होणार का, असाही प्रश्न उपस्थित केला जाऊ लागला आहे.

नवीन नियमावलीनुसार होर्डिंग असावे...

राज्य सरकारकडून नवीन जाहिरात नियमावली २०२२ मध्ये लागू झाली आहे. या नियमावलीनुसार ४० बाय २० फूट एवढ्या आकाराचे होर्डिंग उभारता येते. परंतु ही नियमावली लागू करण्यापूर्वी सदर आकारापेक्षा अधिक आकाराच्या होर्डिंगला परवानगी दिली आहे. त्याच परवानगीच्या आधारे काही व्यावसायिकांकडून मोठे होर्डिंग कायम ठेवण्याचा आग्रह केला जात आहे. काही व्यावसायिकांनी अद्याप आकार बदलला नाही. तसेच दोन होर्डिंगच्या मध्ये निर्धारित केलेले अंतरही पाळले जात नाही. याबाबत प्रशासनाने नवीन नियमावलीनुसारच होर्डिंगचा आकार असला पाहिजे, अशी भूमिका घेतली आहे. या होर्डिंगच्या परवान्याचे दरवर्षी नूतनीकरण करावे लागते. नूतनीकरण करताना नवीन नियमावलीतील आकारानुसारच होर्डिंगचा आकार ठेवला पाहिजे, अशी पालिकेची भूमिका आहे. त्यामुळे आता होर्डिंगधारकांना नियमनियमवलीनुसारच होर्डिंग उभारावे लागणार आहेत.

### एकट्या नगर रस्त्यावर शहरातील 20 टक्के होर्डिंग

» नगररोडवर एकूण ५०० हून अधिक होर्डिंग आहेत. हे होर्डिंग उभारताना राज्य सरकारच्या नियमांना हरताळ फासण्यात आला आहे. नगर रस्त्यावरील विविध भागात अद्याप नियमबाह्य होर्डिंग दिमाखात उभ्या आहेत. मात्र ते होर्डिंग महापालिकेच्या अधिकाऱ्यांनी दिसत कशा नाहीत, असा प्रश्न या भागातील नागरिक नेहमी उपस्थित करतात. एकट्या नगर रस्त्यावर शहरातील २० टक्के होर्डिंग आहेत. अनेक होर्डिंग एकमेकांना जोडले असून त्यामुळे मोठा अपघाताचा धोका होण्याची भीती आहे. त्यामुळे महापालिकेने वेळीच यावर कार्यवाही केली नाही, तर भविष्यात मोठी दुर्घटना झाली तर त्याला महापालिकेचे अधिकारी जबाबदार असतील, असे येथील नागरिकांचे म्हणणे आहे.

# अतिक्रमणे काढा, सिग्नलची वेळ कमी करा

## अंतर्गत रस्त्यांचे रुंदीकरण : पुण्यातील वाहतूक कोंडीवर पालकमंत्री अजित पवार यांचे आदेश

**पुणे | प्रतिनिधी**

येत्या काळात पुणे हे वाहतूक कोंडीमुक्त शहर म्हणून ओळखले जावे, यासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग करावा. आवश्यकतेनुसार एकेरी वाहतूक व्यवस्था सुरु करणे, रस्त्याकडेची अतिक्रमणे काढणे, सिग्नलची वेळ कमी करणे, सिग्नलविरहित वाहतूक व्यवस्थापन, अंतर्गत रस्त्यांचे रुंदीकरण, मिसिंग लिंक्स जोडणे आदी उपाययोजना तातडीने कराव्यात, असे आदेश पालकमंत्री अजित पवार यांनी दिले.



अजित पवार म्हणाले, पुणे शहर आणि परिसरातील औद्योगिक विकासामुळे निर्माण झालेल्या रोजगाराच्या संधींमुळे राज्याच्या विविध भागांतून पुणे शहरात नागरिक येत असतात. त्यामुळे नागरीकरण झपाट्याने झाले आहे. ही प्रक्रिया अजूनही सुरू असून मागील काही वर्षांत पुणे शहराची दुपटीने वाढ झाली आहे.

वाढत्या लोकसंख्येमुळे शहरातील पायाभूत सुविधांवर कमालीचा ताण येऊन वाहतूक कोंडीची समस्या भेडसावत आहे. पुणेकरांची वाहतूक कोंडीच्या समस्येतून कोणत्याही परिस्थितीत सुटका झाली पाहिजे. त्यासाठी विविध उपाययोजनांची प्रभावी अंमलबजावणी करा, असे आदेश त्यांनी दिले.

### उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिलेल्या सूचना

» पोलिसांनी वाहतूक कोंडी सोडविण्यासाठीच्या उपाययोजनांचा प्रस्ताव पाठवावा.

» महापालिकेने नवले जंक्शन येथील अतिक्रमण हटवावे

» कारवाईवेळी पोलीस आयुक्तांनी पोलीस बंदोबस्त उपलब्ध करून द्यावा.

» नवले ब्रिज, कोरेगाव पार्क, अप्पा बळवंत चौक आदी ठिकाणची वाहतूक कोंडी प्राधान्याने सोडवावी

» वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) व अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग करावा.

» सर्व प्रशासकीय यंत्रणांनी समन्वयाने काम करावे

» वाहतूकविषयक तज्ज्ञ प्रतिनिधींचा समावेश असणारी समन्वय समिती स्थापन करावी.